Agrowon, 31/03/2026

# ब्रँडिंग, पॅकेजिंगवर भर देणे गरजेचे

## शेतकरी उत्पादक संस्थांच्या परिषदेत रावल यांचे प्रतिपादन

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

मुंबई : " बदलत्या परिस्थितीत शेतकरी हा केवळ उत्पादक राहून चालणार नाही, तर तो उत्तम उद्योजक बनला पाहिजे. याचबरोबर शेतीमालाच्या उत्पादनासोबतच त्याचे मार्केटिंग, ब्रँडिंग, पॅकेजिंग आणि विक्री या सर्व बाबींमध्ये शेतकऱ्यांनी सहभाग घेतला पाहिजे," असे प्रतिपादन पणनमंत्री जयकुमार रावल यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण केंद्र येथे आयोजित शेतकरी उत्पादक संस्थांच्या (एफपीओ) राज्यस्तरीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते सोमवारी (ता.३०) झाले.

यावेळी बोलताना पणनमंत्री रावल म्हणाले, राज्यात शेतकरी उत्पादक संस्था (फार्मर्स प्रोड्युसर्स ऑर्गनायझेशन : एफपीओ) आणि शेतकरी उत्पादक कंपनी ( फार्मर्स प्रोड्युसर्स कंपनी : एफपीसी) या केवळ योजना नसून त्या शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणाची मोठी चळवळ आहे. लहान व सीमांत शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांना बाजारपेठेत सक्षमपणे उभे करण्यासाठी या संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे. एफपीओच्या माध्यमातून उत्पादन ते विक्रीपर्यंत संपूर्ण मूल्य साखळी उभारता येते. यामध्ये लॉजिस्टिक्स (दळणवळण), वेअरहाउसिंग (गोदामे), प्रक्रिया, पॅकिजिंग आणि मार्केटिंग (विपणन) या सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देता येतील.

शेतमालावर प्रक्रिया करून त्याचे मूल्य वाढवणे अत्यंत गरजेचे असल्याचे मंत्री रावल यांनी सांगितले. सोलर ड्राईंग, पॅकिजिंग, ब्रँडिंग यांसारख्या माध्यमातून शेतमाल अधिक काळ टिकवून त्याला चांगला बाजारभाव मिळवता येतो. राज्यात दरवर्षी सुमारे १० हजार कोटी रुपयांचा शेतमाल पोस्ट-हार्वेस्टमध्ये (काढणीनंतर) वाया जात असल्याचे त्यांनी सांगितले. हे नुकसान टाळण्यासाठी प्रक्रिया उद्योग आणि साठवण सुविधा उभारणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव शरद जरे यांच्यासह शेतकरी उत्पादक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Agrowon, 27/03/2026

# हळद, गूळ, बेदाणा आता 'ऑनलाइन' बाजारात

## सांगली जिल्हाधिकारी : 'फ्लिपकार्ट'चे अधिकारी जिल्ह्याच्या दौऱ्यावर

अॅग्रोवन वृत्तसेवा

सांगली : देशभरातील ग्राहकांना एका क्लिकवर सांगलीची हळद, बेदाणा आणि गूळ आता उपलब्ध होऊ शकणार आहे. ऑनलाइन बाजारात सांगलीची ही खास कृषी उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यासाठी 'फ्लिपकार्ट'ने या तीन शेतीमालांची निवड केली आहे. त्यासाठी या कंपनीचे अधिकारी गुरुवार (ता. २६)पासून दोन दिवसांच्या जिल्हा दौऱ्यावर येत आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी दिली.

काकडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑनलाइन खरेदीदार विक्रेता संमेलनानंतर पुढील टप्प्यात जिल्ह्यातील कृषिविषयक उत्पादनांना ऑनलाइन बाजारपेठ मिळवून देण्यासाठी काम सुरू झाले आहे. प्राथमिक टप्प्यात सांगलीची हळद, बेदाणा आणि गूळ ही तीन उत्पादने ऑनलाइन विक्रीसाठी निवडली गेली आहेत.

याबाबतची पूर्वनियोजन आढावा बैठक नुकतीच झाली. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी विवेक कुंभार, 'आत्मा'चे प्रकल्प संचालक अभयकुमार चव्हाण, कृषी उपसंचालक अमित कवठेकर, जिल्हा विकास आराखड्याचे समन्वयक चंद्रकांत पाटील हे प्रत्यक्ष, तर दूरदृश्यप्रणालीद्वारे अपेडा चेअरमन डॉ. परशराम पाटील, 'मित्रा'चे (महाराष्ट्र इन्स्टिट्युशन फॉर ट्रान्स्फॉर्मेशन) केदार पवार उपस्थित होते.

काकडे म्हणाले, ''जिल्ह्यातील वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांची ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर विक्री होण्यासाठी 'माझी सांगली, माझा अभिमान' या सांगली पॅटर्नअंतर्गत प्रयत्न करण्यात येत आहेत. या माध्यमातून जिल्ह्यातील वैशिष्ट्यपूर्ण कृषी व अन्नप्रक्रिया केलेली उत्पादनांची देशभरात ओळख होऊन विक्रीवाढ व्हावी, उत्पादनांना चांगली बाजारपेठ मिळवून देता यावी, यासाठी महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.''

Agrowon, 21/03/2026

# कृषी, विपणन विकासासाठी जागतिक सहकार्य आवश्यक

## पणनमंत्री रावल : 'विकसित महाराष्ट्र २०४७'ची मांडणी

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : कृषी व विपणन व्यवस्थेचा वेगवान विकास होण्यासाठी परस्पर सहकार्य व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे, असे मत पणनमंत्री जयकुमार रावल यांनी मनिला (फिलिपिन्स) येथील आशियायी विकास बँकेच्या मुख्यालयात आयोजित आंतरराष्ट्रीय परिसंवादात व्यक्त केले.

या परिसंवादाला विविध देशांतील मान्यवरांसह तिमोर-लेस्तेचे उपपंतप्रधान मारीनो आसानामी सबीनो लोपस आणि जपानचे कृषी, वन व मत्स्य व्यवसाय उपमंत्री योईची वाटानाबे आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक व 'मॅग्नेट' प्रकल्पाचे संचालक श्री. विनायक कोकरे उपस्थित होते.

परिसंवादात जागतिक कृषी क्षेत्रासमोरील आव्हाने, शाश्वत अन्नप्रणाली आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर या विषयांवर मते मांडताना रावल यांनी कृषी क्षेत्राचे आधुनिकीकरण, बाजारपेठेतील पारदर्शकता आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या शासनाच्या धोरणांचा ऊहापोह केला. तसेच 'मॅग्नेट' प्रकल्पासाठी जागतिक स्तरावरील सर्वोत्तम पद्धतींचा अभ्यास करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. भविष्यातील सहकार्याच्या नव्या संधींचा शोध घेत महाराष्ट्राच्या कृषी व बाजारव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, असेही ते म्हणाले.

### मूल्यसाखळी बळकटीकरणावर चर्चा

रावल यांनी आशियायी विकास बँकेचे उपाध्यक्ष (दक्षिण, मध्य व पश्चिम आशिया विभाग) श्री. यिंगमिंग यांग यांची भेट घेऊन त्यांच्याशी महाराष्ट्रातील 'मॅग्नेट' प्रकल्प, मुंबई आंतरराष्ट्रीय कृषी बाजार, तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे आधुनिकीकरण व बळकटीकरण यासंदर्भात चर्चा केली. या चर्चेत कृषी मूल्य साखळी अधिक बळकट, सर्वसमावेशक आणि शाश्वत करण्यावर भर देण्यात आल्याचे रावल यांनी सांगितले.

Lokmat, 20/03/2026

# कृषी, विपणनच्या विकासासाठी जागतिक सहकार्य आवश्यकच

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कृषी व विपणन व्यवस्थेचा वेगवान विकास होण्यासाठी परस्पर सहकार्य व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होणे आवश्यक आहे, असे मत राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केले.

मनिला येथे आशियाई विकास बँकेच्या मुख्यालयात आयोजित आंतरराष्ट्रीय परिसंवादात महाराष्ट्राचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी सहभाग घेत राज्याच्या कृषी व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विकासाचा दृष्टिकोन प्रभावीपणे मांडला. या परिसंवादात विविध देशांतील मान्यवरांसह तिमोर-लेस्तेचे उपपंतप्रधान मारिनो आसानामी सबीनो लोपस आणि जपानचे कृषी, वन व मत्स्यव्यवसाय उपमंत्री योईची वाटानाबे व महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक व मॅग्नेट प्रकल्पाचे संचालक विनायक कोकरे उपस्थित होते.

यावेळी मंत्री रावल यांनी 'विकसित महाराष्ट्र व्हिजन २०४७' अंतर्गत राज्यात राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देत कृषी क्षेत्राचे आधुनिकीकरण, बाजारपेठेतील पारदर्शकता आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी शासनाच्या धोरणांवर प्रकाश टाकला.

या दौऱ्यात महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट) साठी जागतिक स्तरावरील सर्वोत्तम पद्धतींचा अभ्यास करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे.

Agrowon, 16/03/2026

# 'एआय' आधारित फळबाग प्रकल्प सुरू

## सातारा जिल्ह्यातील पाच तालुक्यांतील ७२५ हेक्टर क्षेत्रात प्रयोग



> कृषी क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाचा वापर हा भविष्यातील शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आधुनिक आणि शाश्वत शेती पद्धती उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.
>
> **- संतोष पाटील,** जिल्हाधिकारी, सातारा

अॅग्रोवन वृत्तसेवा

सातारा : जिल्ह्यातील शेती अधिक स्मार्ट, अचूक आणि तंत्रज्ञानाधारित करण्याच्या दिशेने सातारा जिल्ह्याने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. जिल्हा नियोजन समिती आणि कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'नावीन्यपूर्ण आधुनिक फळबाग उत्पादन तंत्रज्ञानावर आधारित फळबाग विकास प्रकल्प' योजनेअंतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित युनिट्सच्या स्थापनेला जिल्ह्यात सुरुवात झाली आहे. या प्रायोगिक प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील पाच तालुक्यांतील सुमारे ७२५ हेक्टर क्षेत्रावर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून फळबागांचे व्यवस्थापन केले जाणार आहे.

कृषी विभागाकडून यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना फळपिकांची स्थिती, हवामानातील बदल, मातीतील ओलावा, तसेच कीड-रोगांचा प्रादुर्भाव याबाबत रिअल-टाइम माहिती उपलब्ध होणार आहे. एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने मिळणाऱ्या विश्लेषणामुळे पाण्याचा कार्यक्षम वापर, खत व औषधांच्या खर्चात बचत आणि उत्पादनात वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाग्यश्री फरांदे या प्रकल्पाबाबत माहिती देताना म्हणाल्या, ''एआय आधारित यंत्रणेमुळे पिकांचे सतत निरीक्षण करणे आणि अचूक निर्णय घेणे शक्य होणार आहे. विशेषतः उच्च मूल्य असलेल्या फळपिकांच्या उत्पादकतेत वाढ करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे.''

प्रकल्पात सहभागी होणाऱ्या इच्छुक शेतकऱ्यांना फळपीक उत्पादन वाढ, कीड-रोग व्यवस्थापन, निर्यात दर्जाचे उत्पादन, तसेच कृषी क्षेत्रातील एआय तंत्रज्ञानाच्या वापराबाबत विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच कीड नियंत्रणासाठी फ्रूट फ्लाय ट्रॅप्स- ल्युर्ससह आवश्यक तांत्रिक साह्यही उपलब्ध करून दिले जाणार आहे. या उपक्रमामुळे जिल्ह्यातील शेती 'स्मार्ट' आणि 'प्रिसिजन' शेतीकडे वाटचाल करत असून, डिजिटल कृषी व्यवस्थेच्या दिशेने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे, अशी प्रतिक्रिया तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे.

### १२ गावांची निवड

हा प्रकल्प जिल्ह्यातील पाच तालुक्यांतील एकूण ७२५ हेक्टर क्षेत्रावर राबविण्यात येणार असून, त्यामध्ये कोरडवाहू क्षेत्रातील सलग फळबागांचा समावेश आहे. यामध्ये सातारा तालुक्यातील पाडळी, खटाव तालुक्यातील कलेढोण, निमसोड, फलटण तालुक्यातील धुमाळवाडी, गिरवी, बोडकेवाडी, निरगुडी, माण तालुक्यांतील मार्डी, हवालदारवाडी, कारखेल, भाटकी आणि जावळी तालुक्यातील आखाडे या गावांचा समावेश आहे.